वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ
अवलंबित्व ठरविण्यासाठी उत्पन्नवरील मर्यादा
सुधारण्या बाबत.........
शासकीय कर्मच्याऱ्याचे आई वडिल आणि अविवाहित
व घटस्पोटीत बहिणीसंदर्भात...

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
सार्वजनिक आरोग्य विभाग
क्रमांक:वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकवि/-२,
मंत्रालय,मुंबई/४०० ०३२,
दिनांक:११ नोव्हेंबर,२०११

**वाचा:-** १) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक एमएजी १०९२/६३४/प्र.क्र.६५/आरोग्य-७ दि.२१ ऑगस्ट ,१९९२
२) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.२२०/आरोग्य-३ दि.१८ ऑगस्ट ,१९९९
३) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.९९/आरोग्य-३ दि.२० फेब्रुवारी ,२००३

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल)नियम,१९६१ मधील नियम २(३) अन्वये प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची व्याखा विहित करण्यात आली आहे.या कर्मचाऱ्याचे आई वडिल यांचे एकुन उत्पन्न हे जर दरमहा रु.१,५००/- इतके मुळ निवृत्ती वेतन घेणाऱ्या सेवानिवृत्ती राज्य शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत असेल तर ते वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रायोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यांवर अवलंबित असल्याचे मानले असेल तर ते वैद्यकीय आजारपणावरील उपचारांच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ठरते.

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यात आल्यानंतर वरील मुळ निवृत्तीवेतन वा दरमहा कमाल उत्पन्नाची मर्यादा सुधारण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**२. या संदर्भात शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-**

(अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या आईवडिलांना (१) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा,(२) निवृत्ती वेतन मिळत नसले तरी अन्य मार्गानी उत्पन्न असेल किंवा,(३) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गानीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी ,उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गानी मिळणारे एकुण उत्पन्न हे **दरमहा रु.३,५००/-** इतके मुळ निवृत्तीवेतन घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हण्जे रु.३,५००/- आधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनूज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबित असल्याचे मानले जाईल.

**(ब)** वरील तरतुद शासकीय कर्मचाऱ्यांच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्याच्यावरील अवलंबित्व ठरवितांना तसेच महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिच्या आई वडिलां ऐवजी सासु-सासऱ्यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासु-सासऱ्यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागु असेल.

**३. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन लागु असेल.**

**४.** हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९०/सेवा-५ दिनांक:२६/०९/२०११ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असुन त्याचा संगणक सांकेतांक.
**२०११११११६११२३४६००१** असा आहे.

**वि.वा.राणे**
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव,